**ठळक बातम्या**

- अन्नधान्य निर्मितीत भारताला आत्मनिर्भर करुन, निर्यातीचं लक्ष्य ठेवण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन,

- राज्यातल्या ९ जिल्ह्यांसह देशातल्या एकूण १०० जिल्ह्यांमध्ये पीएम धनधान्य कृषी योजनेची सुरुवात

- जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेतल्या पदक विजेत्यांचा क्रीडा मंत्रालयाकडून सत्कार

**आणि**

- भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या डावात वेस्ट इंडिजची खराब सुरुवात

**<><><><><><>**

अन्नधान्य उत्पादनात भारताला आत्मनिर्भर करणं तसंच जागतिक बाजारासाठी उत्पादन करणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत पीएम धनधान्य कृषी योजना आणि डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता मोहिमेसह ४२ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी योजनांचा प्रारंभ आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या **पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली** या नऊ जिल्ह्यांतही ही योजना सुरू झाली. याबाबत अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**------कॅप्सूल-----**

*(पीएम धनधान्य कृषी योजना देशभरातल्या शंभर जिल्ह्यांमध्ये राबवली जाणार आहे. २४ हजार कोटी तरतूद यासाठी करण्यात आली आहे. कृषी उत्पादकता वाढवणं, सिंचनाच्या सुविधा सुधारणं, शाश्वत कृषी पद्धतीचा*

*अवलंब करणं, शेतकऱ्यांना अल्प आणि दीर्घ मुदतीची कर्ज उपलब्ध करून देणं हे या योजनेचं उद्दिष्ट आहे. धनधान्य कृषी योजनेत पशुधनावर लक्ष केंद्रित केल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.*

***होल्ड बाईट***

*११ हजार ४४० कोटी रुपये खर्चाची डाळ उत्पादनात आत्मनिर्भरता आणणारी मोहीम देशभरात राबवण्यात येणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशातल्या ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळीचं उत्पादन करणं हे या मोहिमेचं उद्दिष्ट आहे. यात तूर, उडीद, मसुर डाळीचं उत्पादन वाढवलं जाईल, याचा फायदा दोन कोटी डाळ उत्पादकांना होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी यावेळी कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यपालन आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातल्या ५ हजार ४५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचंही उद्घाटन केलं.*

*यावेळी प्रधानमंत्र्यांनी गेल्या अकरा वर्षात कृषी क्षेत्रात केलेल्या सुधारणांचा आढावा घेतला. या काळात अन्नधान्य उत्पादन ९०० लाख मेट्रिक टन वाढलं, फळभाज्या उत्पादन ६४० लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त वाढलं, मत्स्योत्पादन, मध उत्पादन दुप्पट झालं, कृषीमालाची निर्यात दुप्पट झाली असं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.*

*रब्बी पिकांच्या हमीभावात सरकारने वाढ केली, प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजने अंतर्गत ३ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरित झाला, असं **केंद्रीय कृषीमंत्री** शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या स्वदेशीच्या आवाहनाला शेतकरीही प्रतिसाद देत असून स्वदेशीची भावना त्यांच्यामधे रुजत आहे, असं चौहान म्हणाले.*

***होल्ड बाईट चौहान***

***त्याआधी** प्रधानमंत्र्यांनी देशभरातल्या निवडक शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यात सहभागी झालेले नांदेड जिल्ह्यातले शेतकरी भगवान इंगोले म्हणाले…*

***होल्ड बाईट शेतकरी***

*राज्यात पुणे इथं आयोजित मुख्य कार्यक्रमात आज धनधान्य कृषी योजनेचा प्रारंभ कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत झाला. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभं केलं जाईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले. कडधान्य हे आपल्या आहारातल्या प्रथिनाचं मुख्य साधन असून आपल्या देशात अजूनही कडधान्याची कमतरता आहे. त्यामुळे हरभरा, मूग, तूर, उडीद, मसूर या डाळींचं उत्पादन वाढवण्याचं उद्दिष्ट सरकारने ठेवलं आहे, असं कृषीमंत्री म्हणाले. शेतीसाठी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करा, सेंद्रीय खताचा वापर करा, शासनाच्या योजनांचा लाभ घ्या, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा, असं आवाहन भरणे यांनी केलं. शेतीसाठी सर्वांनी मिळून एकत्र काम केलं तर महाराष्ट्र शेतीमध्ये अग्रेसर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. राज्यात इतर ठिकाणीही हा कार्यक्रम झाला.)*

**<><><><><><>**

शिक्षण हे सामाजिक पुनर्बांधणीचे सर्वात प्रभावी माध्यम असून भारताला स्वावलंबी बनवणे ही आपली राष्ट्रीय प्राथमिकता आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले आहे, अहमदाबाद इथं गुजरात विद्यापीठाच्या ७१ व्या दीक्षांत

समारंभात संबोधित करताना आज  त्या बोलत होत्या. या प्रसंगी, राष्ट्रपती मुर्मू यांनी नऊ उत्कृष्ट विद्यार्थ्यांना सुवर्णपदके प्रदान केली, तर पीएचडी, एम.फिल, बॅचलर आणि मास्टर्ससह विविध विषयांमध्ये एकूण १ हजार ७१३ पदव्या प्रदान करण्यात आल्या.

<><><><><>

यंदा दिवाळी आणि छठ पुजेच्या कालावधीत रेल्वे विक्रमी संख्येनं विशेष गाड्या सोडणार आहे. अनेक गाड्यांना मोठ्या संख्येनं जनरल डबे जोडल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरच्या प्रवासी सुविधांचं लोकार्पण केल्यावर ते बोलत होते. यामुळे सणासुदीच्या काळात प्रवाशांची गर्दी नियंत्रणात ठेवायला मदत होईल. इथं पुरवलेल्या सुविधा आणखी ७६ रेल्वे स्थानकांवरही उपलब्ध करण्यात येतील असं वैष्णव यांनी सांगितलं.

<><><><><>

अमेरिकेचे भारतातले नियोजित राजदूत सर्जिओ गोर यांनी आज नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर आणि परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांची भेट घेतली. या भेटीमुळं भारत अमेरिका संबंध आणखी दृढ होतील, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला. भारत-अमेरिका संबंध आणि त्याचे जागतिक महत्व याबाबत चर्चा करून गोर यांना आपण नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्याचं जयशंकर यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबई विमानतळावर गेल्या काही दिवसात विविध कारवाईमध्ये सीमाशुल्क विभागानं ४२ किलोहून अधिक अंमली पदार्थ जप्त केलं. या अंमली पदार्थांची किंमत सुमारे ४२ कोटी रुपये आहे.

<><><><><>

जपानमध्ये फ्लूचा वेगाने प्रसार होत असल्यानं सरकारनं या आजाराची राष्ट्रीय साथरोग म्हणून घोषणा केली आहे. चार हजारांहून अधिक नागरिकांना फ्लूची लागण झाली आहे. ओकिनावात सर्वाधिक रुग्ण आहेत. मुलांनाही या तापाची लागण होत असल्यानं १०० हून अधिक शाळा, बालवाड्या आणि बालसेवा केंद्रं बंद आहेत.

**<><><><><>**

सुदानमध्ये एल-फाशेर इथं निर्वासितांच्या एका छावणीवर रॅपिड सपोर्ट फोर्सेसने केलेल्या ड्रोन हल्ल्यात किमान ६० जण ठार झाले. सुदानचं निमलष्करी दल असलेल्या रॅपिड सपोर्ट फोर्सेसनं गेल्या १७ महिन्यांपासून एल-फाशेरला वेढा घातला आहे. २०२३मध्ये आरएसएफ आणि सुदानच्या लष्कराच्या प्रमुखांमध्ये मतभेद झाल्यानंतर सुदानमध्ये हा संघर्ष सुरू आहे.

**<><><><><>**

मेक्सिकोत आलेल्या पुरात २७ जणांचा मृत्यू झाला. गुरुवार आणि शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांची पात्रं भरून वाहत आहेत. या पुरामुळे अनेक ठिकाणी भूस्खलन झालं तसंच पूल आणि घरं कोसळल्याच्या घटना घडल्या. मातीच्या ढिगाऱ्यांमुळे अनेक महामार्ग बंद झाले आहेत.

**<><><><><>**

पाकिस्तानातल्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात पोलीस प्रशिक्षण केंद्रावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहा दहशतवादी ठार झाले. या चकमकीत सात पोलीस कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. डेरा इस्माइल खान भागातल्या पोलीस प्रशिक्षण केंद्रावर दहशतवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला.

**<><><><><>**

जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद २०२५ स्पर्धेतल्या पदक विजेत्या खेळाडूंचा युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी नवी दिल्लीत

सत्कार केला. देशाला अभिमान वाटणाऱ्या या खेळाडूंचं असामान्य कर्तृत्व, दृढनिश्चय आणि विक्रमी कामगिरीची त्यांनी प्रशंसा केली. जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद २०२५ स्पर्धेत भारतानं आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी करत ६ सुवर्ण, ९ रौप्य आणि ७ कांस्यपदकं पटकावत इतिहास रचला.

**<><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात वेस्ट इंडिजचा डाव घसरला. भारतानं उभ्या केलेल्या ५१८ धावांचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजचे खेळाडू फार काळ खेळपट्टीवर टिकू शकले नाहीत. त्यांच्या एकाही खेळाडूला अर्धशतकही करता आलं नाही. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा वेस्ट इंडिजनं पहिल्या डावात ४ गडी बाद १४० धावा केल्या आहेत. रविंद्र जडेजानं ३ गडी टिपले. त्याआधी, भारतानं पहिला डाव ५१८ धावांवर ५ गडी गमावून घोषित केला. कर्णधार शुभमन गिल १२९ धावांवर नाबाद राहिला. गिलने एकाच कॅलेंडर वर्षात पाच शतकं करण्याच्या विराट कोहलीच्या विक्रमाचीही आज बरोबरी केली. कालच्या २ बाद ३१८ धावसंख्येवरुन आपला पहिला डाव सुरु करणाऱ्या भारतानं सकाळी आपला तिसरा गडी झटपट गमावला. काल दिवसअखेर १७३ धावांवर नाबाद असलेला यशस्वी जयस्वाल अवघ्या २ धावा काढून धावबाद झाला. त्यानंतर मात्र कर्णधार शुभमन गिल आणि नितीशकुमार रेड्डीनं चौथ्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी केली.

**//<><><><><>//**